महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १११ वा | दिनांक : २५/०१/२०२५ | वार : शनिवार

## बर्फाचे कपडे घालून येवढ्या थंडीत दावोसला जायची काय गरज : आदित्य ठाकरेंची मुख्यमंत्र्यांवर टीका



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दावोस दौऱ्यावर युवसेना प्रमुख व ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी टीका केली आहे. ५४ सामंजस्य करार करण्यात आले. यातील ४३ कंपन्या भारतातल्याच आहेत, तर ११ विदेशी कंपन्या आहेत.

एवढ्या कंपन्या भारतातल्या आहेत तर मग मॅग्नेटिक महाराष्ट्र कार्यक्रम का नाही घेतला? असा सवाल आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. तसेच बर्फाचे कपडे घालून फोटो काढण्यापेक्षा सह्याद्री किंवा मॅग्नेटिक महाराष्ट्र कार्यक्रम घेऊन पैसा कमी खर्च झाला असता असा टोला देखील आदित्य ठाकरे यांनी लगावला आहे.

आदित्य ठाकरे म्हणाले, बर्फाचे कपडे घालून फोटो काढण्यापेक्षा सह्याद्री किंवा मॅग्नेटिक महाराष्ट्र कार्यक्रम घेऊन पैसा कमी खर्च झाला असता. नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे आपल्या गावाला आणि त्यांचे लाडके मंत्री मुख्यमंत्र्यांसोबत होतो. त्यांच्या विभागाचे करार मुख्यमंत्र्यांनी केले. नगरविकास विभागाचे अधिकारी दावोसला आणि मंत्री गावाला, त्यांना निमंत्रण होते की नाही? त्यांना सोबत का नेले नाही? ती नाराजी आता त्यांच्या चेहऱ्यावर दिसत आहे, असे म्हणत आदित्य ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर देखील निशाणा साधला.

आदित्य ठाकरे पुढे बोलताना म्हणाले, एसआरए आणि रस्त्याच्या कॉंट्रॅक्टला सुद्धा पुढच्या वेळेस दावोसला घेऊन जातील असे कळते आहे. टेंडर काढून काम द्या काही ठिकाणी तुम्ही थेट करार करताय. प्रोटोकॉलनुसार मुख्यमंत्र्यांच्या आधी उद्योग मंत्री पोहोचायला हेवत. पण ते मुख्यमंत्र्यांच्या नंतर गेले होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाराज होते म्हणून उशीरा निघाले का? असा सवाल आदित्य ठाकरे यांनी विचारला आहे.

उद्योग मंत्री यांचा असा काय कार्यक्रम होता जे तिथे थांबू शकत नव्हते? पक्षांतर्गत नाराजी होती का? मुख्यमंत्री सगळे काम सोडून तिथे थांबत होते, मात्र उद्योगमंत्री का थांबू शकत नाहीत? असे म्हणत आदित्य ठाकरे यांनी उदय सामंत यांच्यावर निशाणा साधला आहे. तसेच गेल्या दोन वर्षात मॅग्नेटिक महाराष्ट्राचा कार्यक्रम झालेला नाही. मॅग्नेटिक महाराष्ट्र कार्यक्रम घेणे गरजेचे आहे असे ठाकरे म्हणाले.

पुढे बोलताना आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सल्ला दिला आहे. ते म्हणाले, सल्ला देण्याइतका मी एवढा मोठा नाही. पण इतर राज्यातील मुख्यमंत्री दुसऱ्या राज्यात जाऊन मॅग्नेटिक महाराष्ट्र सारखा कार्यक्रम घेतात तो घ्यावा. संपूर्ण चार दिवस करार करण्यामध्ये घालण्यात अर्थ नव्हता. जगभरातले नेते, विविध देशातील उद्योगपती यांच्या भेटीसाठी घेण्यास सुद्धा गरजेच्या आहेत. तो प्रयत्न मी केला होता. मात्र, यावेळी असा कुठलाही प्रयत्न झाला नाही. कोणत्याही भेटी घेतल्या नाहीत. तसेच काही गुंतवणूक चांगल्या झाल्या याचा आनंद आहे. पण काही ठिकाणी गुंतवणूक झाल्यासारखे दाखवून फसवले जात आहे, असा आरोपही आदित्य ठाकरे यांनी केला आहे.

## 'जेपीसी'च्या बैठकीत 'वक्फ'च्या मुद्यावर राडा

**मुंबई :** वक्फ सुधारणा विधेयकाच्या मुद्यावर शुक्रवारी संयुक्त संसदीय समितीची बैठक झाली. या बैठकीत प्रस्तुत विधेयकाच्या मसुद्याचा अभ्यास करण्यासाठी मिळणाऱ्या कालावधीवरून विरोधी पक्षांचे खासदार चांगलेच आक्रमक झाले. परिणामी, समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांच्यासह १० सदस्यांवर निलंबनाची कारवाई केली. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना सावंत यांनी समितीची कार्यपद्धती हुकूमशाहीसारखी असल्याचा आरोप केला.

अरविंद सावंत म्हणाले, आपली संयुक्त संसदीय समिती विक्षिप्त व हुकूमशाही पद्धतीने चालली आहे. हे लोक मनात येईल ते करत आहेत. आम्ही एखाद्या गुलामासारखे उभे रहावे अशी त्यांची इच्छा आहे. त्यांना कोणत्या गोष्टीची घाई झाली आहे? अलीकडेच आम्ही ४ दिवसांच्या दौऱ्यावर होतो. लखनऊत झालेल्या २१ जानेवारीच्या बैठकीत आम्हाला २२ जानेवारी रोजी सायंकाळी ४ वाजेपर्यंत तुम्ही कलमानव्ये सुधारणा सूचवण्याचा बॉम्ब टाकण्यात आला. हे अत्यंत महत्त्वाचे विधेयक आहे. यामुळे देशात अराजक निर्माण होऊ शकते.

त्यामुळे आम्ही समितीकडे वेळ वाढवून मागितला. पण त्यांनी नकार दिला. त्यानंतर आम्ही रात्रभर जागून त्यावरील सुधारणा पाठवल्या. आता ते पुन्हा म्हणाले की, २४-२५ जानेवारी रोजी बैठक आहे. कशासाठी? तर प्रत्येक कलमान्वये ज्या सुधारणा करायच्या आहेत त्यावर चर्चा आहे. त्यासाठी आम्ही येथे आलो. बैठक सुरू झाल्यानंतर यांचे ठरले की, चर्चा होणार नाही.

काश्मीरमधील लोकांना आम्ही साक्षीसाठी बोलावले आहे. आम्ही अगोदरच म्हणालो होतो की, सर्व राज्यांच्या प्रतिनिधींना बोलवा. काश्मीर राहिले होते. त्याची त्यांना आज आठवण झाली, असे सावंत म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, आम्ही त्यांना आता कलमांवर केव्हा चर्चा होणार? असा प्रश्न केला. त्यावर ते म्हणाले २७ जानेवारीला. आज व उद्याच्या बैठकीमुळे आमचे पूर्वनियोजित कार्यक्रम बदलले. त्यामुळे आम्ही त्यांना ही बैठक ३१ जानेवारीला घेण्याची विनंती केली. ते नाही म्हणाले. ही कसली जबरदस्ती आहे. त्यानंतर आम्ही सूचवले की, सुप्रीम कोर्ट व हायकोर्टाने दिलेल्या निर्णयांतही विरोधाभास आहे. त्यावरही चर्चा करण्याची गरज आहे. १३ फेब्रुवारीपासून १० मार्चपर्यंत वेळ आहे. अधिवेशनापूर्वी अहवाल द्यायचा, तर १० मार्चनंतर देऊन टाका असे आम्ही म्हणालो. त्यावर त्यांनी हा अहवाल २७ तारखेलाच द्यायचा असल्याचे सांगितले.

जेपीसीचे अध्यक्ष एखाद्या खेळण्यासारखे आहेत. त्यांना निर्णय घेण्याचा कोणताही अधिकार नाही. त्यांना वरून कुणीतरी फोन करून सांगत होते की, २७ जानेवारी करायचे आहे. कारण, दिल्लीची विधानसभा निवडणूक आहे. भाजप निवडणुकीच्या पलिकडे जाऊन केव्हाच देशाचा विचार करत नाही. मग भलेही अराजक माजले किंवा दंगली झाल्या तरी चालतील.

अरविंद सावंत पुढे म्हणाले, ३१ जानेवारीच्या तारखेवर काय करायचे यावर चर्चा सुरू असतानाच त्यांनी काश्मीरच्या शिष्टमंडळाला आत बोलावून घेतले. म्हणजे ते आले तर आम्ही गप्प बसू म्हणून. आमची चर्चा झाली नाही. तुम्ही निर्णय दिला नाही आणि तुम्ही शिष्टमंडळाला बोलावले. आम्ही विचारत होतो की, ३१ जानेवारी करायचे की, १३ फेब्रुवारीनंतर... पण उत्तर देण्यापूर्वीच त्यांना कॉल आला. त्याने सांगितले की, २७ जानेवारीलाच करायचे आहे. ही काय पद्धत आहे का? ही लोकशाही आहे का? आम्ही या पद्धतीवर बोट ठेवले असता आम्हा १० जणांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २५ जानेवारी २०२५


## राजीव गांधी महाविद्यालय, करमाडच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराचा समारोप



**करमाड :** राजीव गांधी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा समारोप भांबर्डा येथे दिनांक २३-०१-२०२५ रोजी यशस्वी शिबीर संपन्न झालेले असून यानिमित्त ह.भ.प. चंद्रकलाताई फुकटे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एस.एस. मुळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन कार्यक्रमाचा समारोप केला.

यावेळी प्रमुख उपस्थिती मध्ये भांबर्डाचे सरपंच इंदुबाई पठाडे, ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. या शिबीरा दरम्यान पर्यावरण जनजागृती, वृक्ष लागवड, बालविवाह प्रतिबंध, हुंडाबंदी, समाजप्रबोधन, आरोग्य, रक्तदान शिबीर, गटचर्चा, सांस्कृतिक प्रबोधन इत्यादी उपक्रम राबविण्यात आलेले होते. रा.से.यो शिबिराचा समारोप प्रसंगी कार्यक्रमाचे कार्यक्रमाधिकारी डॉ.कालिदास फड यांनी सात दिवसांमध्ये झालेल्या कार्यक्रमाचे अहवाल वाचन केले. सुत्रसंचलन डॉ. नानासाहेब लावंड तसेच बक्षीस वितरणाचे संचलन डॉ. किशोर काळे आणि आभार प्रा.लक्ष्मण खरात यांनी मानले.

शिबीर यशस्वी करण्यासाठी सेवाजेष्ठ प्रा. डॉ. बाळासाहेब लिहिणार यांचा विशेष सहभाग होता या कार्यक्रमानिमित्त प्रा. डॉ. जयश्री पाटील, प्रा. डॉ. सुखदेव पोटदुखे, प्रा.हरिदास होळकर, प्रा.डॉ. इम्रान पठाण, प्रा.लक्ष्मण खरात, डॉ. ललित गोल्डे, प्रा. डॉ.रमेश कचरे, प्रा. डॉ. गोकुळ सुरासे, प्रा. डॉ. नितीन मुळे, प्रा. डॉ. अमित राऊत, डॉ. मोरे, मधुकर राठोड, शिवकुमार मुक्तापुरे, श्रीमती अलका कुलकर्णी, श्रीमती पारेकर यांच्यासह डॉ. चिंचोलीकर, डॉ. दांडगे व महाविद्यालयातील कर्मचारी व भांबर्डा गावातील ग्रामस्थ आणि मोठ्या संख्येने स्वयंसेवक विद्यार्थी -विद्यार्थीनी उपस्थित होते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## डिजिटल साक्षर होणे लोकांसाठीकाळाची गरज : प्रा. डॉ. कुलकर्णी



**जालना (प्रा.डॉ.राजेंद्र सोनवणे) :** ऑनलाइन फसवणूक मोठ्या प्रमाणावर होत असून, याला आळा घालण्यासाठी लोकांनी डिजिटल साक्षर होणं गरजेचं आहे. असे प्रतिपादन जेईएस महाविद्यालय जालनाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित सायगाव (डोंगरगाव) विशेष श्रमसंस्कार शिबिरात प्रा. डॉ. गणेश कुलकर्णी यांनी केले.

जे ई एस महाविद्यालय जालना च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे सायगाव (डोंगरगाव) ता.बदनापुर, जि. जालना येथे सात दिवशीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी'युवकांसाठी डिजिटल साक्षरता'या विषयावर प्रा.डॉ. गणेश कुलकर्णी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. नानासाहेब गोरे हे होते व्यासपीठावर राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे ,प्रा. शिल्पा कवना, प्रा. वर्षा झवर यांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून बोलताना प्रा.डॉ गणेश कुलकर्णी म्हणाले की, सध्या भारतीय लोकांची ऑनलाईन फसवणूक मोठ्या प्रमाणावर होत असून त्यासाठी डिजिटल साक्षर होणं गरजेचे आहे विशेषता युवकांनी डिजिटल तंत्रज्ञान समजून घेतले पाहिजे. त्याविषयी समाजामध्ये जनजागृती केली पाहिजे.

फसव्या लिंक टाकून ऑनलाईन फसवणूक मोठ्या प्रमाणावर होत आहेत ही फसवणूक करणारे मंडळी फार काही शिकलेली नसते परंतु डिजिटल किंवा संगणकीय ज्ञान त्यांना प्राप्त असते म्हणूनच ते वेगवेगळ्या लिंक टाकून ऑनलाईन फॉरड करत असून, बऱ्याच वेळा तुमच्या फोनचा डाटा चोरला जाऊन त्याचा मिस युज करत असतात असेही डॉ.कुलकर्णी यांनी सांगितले.

यावेळी अध्यक्ष समारोप करताना प्रा.डॉ.नानासाहेब गोरे म्हणाले की डिजिटल साक्षर होणे ही काळाची गरज आहे.

पूर्वीसारखी आज परिस्थिती राहिली नसून, विज्ञान- तंत्रज्ञाने खूप मोठी क्रांती केली आहे त्यामुळे शाळा व कॉलेजमधून डिजिटल साक्षरतेचे शिक्षण दिले पाहिजे असेही डॉ.गोरे यांनी सांगितले.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.राजेश सरकटे प्रा. योगेश लहमाटे प्रा. किशोर तापडिया आदी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहन पाटील यांनी केले तर उपस्थितांचे आभार सदाशिव उबाळे यांनी मानलेत.

## शाळेतील मुलींना मिळाल्या नवीन सायकली, चावी हाती येताच मुलींच्या चेहऱ्यावर फुलले हास्य



**मुरूम, ता. उमरगा येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेत वाढदिवसाचे औचित्य साधून सात विद्यार्थिनींना सायकलचे वाटप करताना मान्यवर व शिक्षकवृंद.**

**मुरुम, ता. उमरगा, ता. २४ (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** शहरातील सामाजिक कार्यकर्ते तथा युवा सेना जिल्हा उपप्रमुख प्रल्हाद उर्फ भगत माळी यांच्या पुढाकाराने जिल्हा परिषद कन्या प्रशालेत सात सायकलीचे वाटप करण्यात आले. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीचे औचित्य साधून माजी खासदार रवींद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली व तालुक्याचे माजी आमदार तथा शिवसेना उपनेते ज्ञानराज चौगुले व मराठवाडा युवासेना पक्ष निरीक्षक किरण गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवारी (ता. २४) रोजी जिल्हा परिषद कन्या प्रशालेत शिकत असलेल्या ग्रामीण भागातून दररोज ये-जा करणाऱ्या होतकरू व गरीब विद्यार्थिनींना सात सायकलीचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

शाळेतील विद्यार्थिनींना आर्थिक सहाय्य व्हावे म्हणून भगत माळी यांनी स्वखर्चाने सायकली देत असल्याचे भगत माळी यांनी सांगितले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका मंकावती कांबळे म्हणाल्या की, भगत माळी यांनी आमच्या प्रशालेला सात सायकली दिल्याचे कौतुक, समाधान व आभार व्यक्त केले. संदीप बाबळसुरे, वैभव इंगळे, प्रतिक राठोड, विठ्ठल चौधरी, प्रशांत राठोड, सोनाली कलशेट्टी, स्वप्नील पाटील, शेके गुरुजी, अलका गायकवाड, विजय महामुनी, सचिन राठोड आदींनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. वंदना जाधव तर आभार सोनाली कलशेट्टी यांनी मानले. शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २५ जानेवारी २०२५

## राष्ट्रीय सेवा योजना शिबिरे ही तरुणांच्या व्यक्तिमत्त्वाची साधने : प्राचार्य अशोक सपाटे




नाईकनगर, ता. उमरगा येथील राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या समारोप प्रसंगी बोलताना अशोक सपाटे, गोविंद चव्हाण, चंद्रकांत बिराजदार, रवींद्र आळंगे व अन्य.

**मुरुम, ता. उमरगा, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** भारत हा जगात तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो. तरुणांना सक्षम व समृद्ध बनविण्यासाठी चांगल्या विचारांची आवश्यकता असते. असे चांगले विचार आणि उपक्रमशीलता ही अशा राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरांमधून मिळते. अशी राष्ट्रीय सेवा योजनेची शिबिरे ही तरुणांच्या व्यक्तिमत्त्वाची साधने असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. अशोक सपाटे यांनी केले.

नाईक नगर, ता. उमरगा येथे श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित वार्षिक विशेष शिबिर समारोपप्रसंगी शुक्रवारी (ता. २४) रोजी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

प्रारंभी महात्मा गांधी व संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी नाईकनगर (सुं) चे मुख्याध्यापक गोविंद चव्हाण, उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. प्रतापसिंग राजपूत, माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीचे समन्वयक प्रा. डॉ. रवींद्र आळंगे, प्रा. अशोक बावगे आदिंची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना अशोक सपाटे म्हणाले की, आज युवकांसमोर विविध आव्हाने आहेत. यामध्ये वाढती व्यसनाधीनता, अंधश्रद्धा, बदलती मानसिकता, मोबाईलचा अतिरेकी वापर, गुन्हेगारीकरण, वाढते प्रदुषण आदि. या आव्हान व समस्यांवर तरुणांनी एकत्रित येऊन काम केले पाहिजे.

सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगात इथला तरुण संगणक क्षेत्रात साक्षर होऊन इतरांनाही त्यांनी साक्षर केले पाहिजे. यावेळी डॉ. चंद्रकांत बिराजदार यांनी मनोगत व्यक्त केले. सदर शिबिर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. प्रतापसिंग राजपूत, प्रा. अशोक बावगे, डॉ. शिला स्वामी, डॉ. प्रकाश कुलकर्णी, डॉ. विलास खडके, डॉ. राम बजगिरे, डॉ. नागोराव बोईनवाड, डॉ. नरसिंग कदम, डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, डॉ. विनायक रासुरे, प्रा. गोपाळ कुलकर्णी, प्रा. अजिंक्य राठोड, दिलीप घाटे, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक अभिषेक पुजारी, श्रीकांत शुक्ला, श्रावण कोकणे, चंद्रकांत पुजारी आदिंनी पुढाकार घेतला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. अशोक बावगे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले तर आभार डॉ. प्रतापसिंग राजपूत यांनी मानले. बहुसंख्येने विद्यार्थी-विद्यार्थीनी, ग्रामस्थ उपस्थित होते.

## हॅकथॉन विज्ञान प्रदर्शन स्पर्धेतज्ञानविकास प्राथमिक शाळा जिल्ह्यात अव्वल



**कन्नड (अरुण थोरात):** संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांचे आदेशाने, प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था छ. संभाजीनगर, शिक्षण विभाग छत्रपती संभाजी नगर वतीने जिल्हास्तरीय हेकथॉन स्पर्धा चिकलठाणा छत्रपती संभाजी नगर येथील वरात विद्यामंदिरात आयोजित करण्यात आली होती.

शाळा स्तरावरती प्रयोगाची मांडणी करत, ऑनलाइन प्रयोगाचे सादरीकरण, स्पष्टीकरण या स्पर्धेत देण्यात आले होते. जिल्हाभरातून १०० प्रयोगांचा सहभाग होता.यात ज्ञानविकास प्राथमिक शाळा भराडी येथील सोहम शिंदे, यश अक्कर या विद्यार्थ्यांचा वाहतूक व दळणवळण हा प्रयोग विजेता ठरत राज्यस्तरावरती निवडला गेला.

या प्रयोगात अपघात टाळण्यासाठी काय काय उपाययोजना करता येईल, अपघात झालाच तर लगेच आरोग्य सेवा कशा उपलब्ध होईल तेही स्वस्त दरात. यासाठी विद्यार्थ्यांनी सृजनशीलता, कल्पकता मांडत आदर्श प्रयोगाची मांडणी केली आहेत.एका पेक्षा एक, अधिक सरस असलेल्या प्रयोगांचे परीक्षण डॉ.रवी जाधव, माधुरी दलाल, श्री शेख सलीम यांनी केले.

विजेत्या विद्यार्थ्यांना प्राचार्या सानवी देशमुख, हॅकॅथॉन उपक्रमाचे नोडल अधिकारी डॉ. प्रकाश मांटे, संस्थाप्रमुख अशोकदादा गरुड, सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी एम. के. देशमुख, शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, शिक्षणाधिकारी अश्विनीताई लाठकर, योजनेच्या शिक्षणाधिकारी अरुणा भुमकर, शिल्पाताई गरुड, डॉक्टर बोराप्पा शिंदे, डॉ.सुजाता भालेराव, डॉ. सतीश सातव, डॉ. महादेव हंडाळ, डॉ. सोनाली बारहाते, डॉ. माधुरी दलाल, श्रीमती तांदळे, सत्यनारायण मुराडी, श्री. अबुलंगेकर, श्री कानोडे, जयराम खाडे, जालम चौरे, आप्पा कानडजे, आदित्य गरुड, प्रतीक वाघ, धनंजय काटे, राम गरुड, विजय साबदे, सुहास पाटील, ज्ञानेश्वर देशमुख, सुनीता काकडे, प्रकाश शिंदे, सुनील हिवाळे, प्राध्यापक एन. ढोरमारे, शिवाजी साखरे, अनिलकुमार थोरात, गणेश शिंदे, आदींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# महामानवांची जयंती उत्साहात साजरी



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील बलसूर येथील श्नी. छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुवारी (ता.२३) थोर क्रांतीकारक नेताजी सुभाषचंद्र बोस आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली.

प्रतिमेचे पूजन उपमुख्याध्यापक रमेश चेंडकाळे व पर्यवेक्षक सतीश वाकडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जयचंद्र जाधव, प्रा.परमेश्वर सूर्यवंशी, एम.डी.काळे, अविनाश सुरवसे, भैरवनाथ सजे, नागनाथ तेलंग,कवी संजय गायकवाड, प्रा.यु.पी.कांबळे, जे.डी.बुवा,सुनिता सांळुके, जुगल चव्हाण, स्वाती मुर्टे,सतीश कांबळे,विपुल चव्हाण आदीसह प्राध्यापक, शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी प्रा.परमेश्वर सूर्यवंशी यांचे नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या व्यक्तिमत्वावर समायोचित भाषण झाले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे समकालीन विचार ,देशाप्रती असलेली त्यांची निष्ठा,प्रेम आणि त्याची उपयोगिता यावर प्रकाश टाकत सूर्यवंशी पुढे म्हणाले की," विचारांची सुसूत्रता, त्याचबरोबर मांडणीतून परखडपणा आणि प्रखर राष्ट्रनिष्ठा हीच बाळासाहेब ठाकरे आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या विचारांची प्रेरणा होती. या प्रेरणेतून आजचा विद्यार्थी घडला पाहिजे.

अशा महान विभूती काळावर स्वार होत असतात, काळ त्यांना घडवत नाही तर ते कालखंड घडवत असतात अशा आदर्श विचारांची शिदोरी घेऊन विद्यार्थ्यांनी यशस्वी वाटचाल करावी असे आवाहन केले. सूत्रसंचालन बळीराम नांगरे यांनी केले तर एस.टी. गायकवाड यांनी आभार मानले. राष्ट्रगितानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २५ जानेवारी २०२५


## जीवनातील परिस्थिती कशीही असती तरी ती बदलविता येते : मनपा आयुक्त जी. श्रीकांत



**कन्नड (अरुण थोरात):** जिवनात परिस्थिती कशीही असली तरी ती बदलता येते, त्यासाठी कोणत्याही गोष्टीचा बाऊ न करता प्रचंड जिद्द व कष्ट मेहनत असेल तर काहीही अशक्य नाही. प्रचंड कष्टाशिवाय आयुष्य घडवता येत नाही. असे प्रतिपादन मनपा आयुक्त जि. श्रीकांत यांनी केले.

कन्नड येथील सहकार महर्षी बाळासाहेब पवार सर्वजनिक वाचनालय व बाळासाहेब पवार फाऊंडेशन यांच्या वतीने लोकनेते बाळासाहेब पवार तिन दिवशीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. (ता. २३ ते २४ ) या व्याख्यानमालेचे हे तिसरे वर्ष आहे. संवाद ध्येयवादी माणसांशी अशा असामान्य कर्तृत्ववान माणसांना निमंत्रित करण्यात आले आहे.

व्याख्यानमालेचे पहिले पुष्प छत्रपती संभाजीनगर मनपा आयुक्त जि. श्रीकांत यांनी गुंफले. पुढे बोलतांना ते म्हणाले की मी एका सामान्य शेतकरी कुटूंबात जन्मलो. प्रतिकुल परिस्थिती त संघर्ष करीत मुक्त विद्यापीठातून शिक्षण घेतले.

तिकिट कलेक्टर ते पुढे डिस्ट्रिट कलेक्टर झालो. रेल्वे सेवत असतांना एका खासदाराने अवकात काढली. तेव्हाच ठरवले की खूप मोठे व्हायचे. त्यासाठी युपीएस सी ची परीक्षा दिली. यश मिळाले तेव्हा कुणाचाही विश्वास बसला नाही. युपीएससी परिक्षा केवळ श्रीमंत कुटूंबातील मुलेच देऊ शकतात असे नाही तर कुणीही देऊ शकतो.

आपल्या जडणघडणीत आई वडिलांची भूमिका सकारात्मक असणे आवश्यक आहे. त्यांनी आपल्या मुलांना प्रेरणा व बळ दिले पाहिजे. ज्यांच्या मनगटात ताकद व मोठे स्वप्न बघण्याची तयारी आहे त्याच्या साठी युपीएससी हे क्षेत्र आहे.

जिवनात विद्यार्थ्यांनी मोठे स्वप्न पाहिले पाहिजे. असेही ते म्हणाले मुलाखतकार सचिन दाभाडे यांनी विविध प्रश्न विचारून बोलते केले. विविध उदाहरणे व घटना प्रसंगातून त्यांनी आपली मते परखडपणे मांडली. उत्तरोत्तर मुलाखत रंगत गेली. उपस्थितांनी प्रचंड दाद दिली.यावेळी त्यांची प्रकट मुलाखत व्यवस्थापन प्रशिक्षक व सल्लागार सचिन दाभाडे यांनी घेतली. प्रारंभी लोकनेते बाळासाहेब पवार यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.

अभंग गाऊन कु. निशा राठोड यांनी कार्यक्रमात पाहुण्यांचे स्वागत केले. पाहुण्यांचे स्वागत प्रा. एस. बी. मतसागर व धैर्यशिल केरे यांनी केले. प्रास्ताविक किसन काकरवाल यांनी केले. कार्यक्रमास वाचनालयाचे अध्यक्ष, उद्योजक मानसिंह पवार, डॉ. ए.के. महाले, चंद्रकांत देशमुख, अॅड. कृष्णा जाधव, सुधीर घुगे, प्राचार्य डॉ. विजय भोसले, प्राचार्य डॉ. राहुल क्षिरसागर, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, रामकृष्ण पवार, डॉ. रमेश सूर्यवंशी, डॉ. रुपेश मोरे, संजय जाधव , डॉ. के . एल. भानुसे, आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमास विद्यार्थी, युवक, शिक्षक, प्राध्यापक, महिला, यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गणेश विसपुते यांनी केले तर आभार ग्रंथालयाचे कर्मचारी रुषिकेश शिवदे यांनी मानले.

## गुरुकुलम शिशु वाटिकेत पार पडला हळदी कुंकवाचा कार्यक्रम!



**बदनापूर (डॉ. रामेश्वर पाटील) :** देवगिरी प्रतिष्ठान आयोजित मकर संक्रांति निमित्त हळदी कुंकवाचा कार्यक्रम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक शितल ताई नारायण कूचे ,अंबडच्या नगराध्यक्षा संगीता देविदास कूचे व अंजली ताई बडवे यांच्या विशेष उपस्थितीत बदनापूर येथील गुरुकुलम शिशु वाटिका येथे पार पडला.

विद्यार्थ्यांना भारतीय सणांची ओळख व्हावी या हेतूने गुरुकुलम शिशु वाटिकेत विविध सण पारंपारिक पद्धतीने साजरे केले जातात, मकर संक्रांति व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीला होणारे साडेतीनशे वर्ष याचे औचित्य साधून गुरुकुलम शिशुवाटिकेत राष्ट्र सेविका समितीच्या अंजली बडवे यांचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावरील व्याख्यान व हळदी कुंकवाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रमाणे प्रत्येक महिला ही एक उत्तम प्रशासक व कर्तबगार व्यक्ती असते परंतु गरज असते ती फक्त तिने आपल्यातील अहिल्यादेवी किंवा जिजाऊंना ओळखण्याची असे प्रतिपादन यावेळी अंजलीताई बडवे यांनी केले.

संस्थेच्या सचिव डॉ.अनुराधा पाटील यांनी यावेळी उपस्थित सर्व महिलांना रामरक्षा स्तोत्र ही पुस्तिका देऊन वाचनाचा संदेश उपस्थितांना दिला. सदरील नावीन्यपूर्ण उपक्रमास शाळेचे पालक व परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला,या प्रसंगी विद्या मात्रे, गीता मात्रे, रेनुताई घन, कोमल खेंडके,वैष्णवी बाहेती, शिवकन्या जऱ्हाड, आशा मात्रे,निशा वाकडे, शकुंतला लव्हाळे, निल्लेवाड मॅडम,साळवे ताई, आरसूळ ताई,राजपूत ताई,रोहिणी जऱ्हाड, खरात ताई,तांबे मॅडम आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या शिक्षिका अश्विनी डिगे, ज्योती दांडगे व आलेश कांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## शिवा संघटनेचा ३० वा वर्धापन दिन सोहळा दि.२८ जानेवारी २०२५ ला बसवकल्याण मध्ये साजरा होणार : प्रा. मनोहर धोंडे

### कर्नाटक राज्याचे वन मंत्री मा. ना. ईश्वर खंड्रे व २५ मठाधिपती उपस्थित राहणार

**प्रतिनीधी (दि. २३):** शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेचा ३० वा आणि सेवा जनशक्ती पार्टीचा दुसरा वर्धापन दिन सोहळा मंगळवार, दि. २८ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ठिक १२:३० वाजता १०८ फुटी महात्मा बसवेश्वर पुतळा, बसवमहामणी, बंगला रोड, बसवकल्याण, जि. विदर, कर्नाटक राज्य येथे अत्यंत उत्साहात संपन्न होणार आहे.

या वर्धापन दिन सोहळ्यानिमीत्त महाराष्ट्रासह कर्नाटक राज्यातील वीरशैव लिंगायत व बहुजन समाजाचा भव्य मेळावा आयोजित केला असुन या मेळाव्याचे उद्धाटन कर्नाटक राज्याचे लोकप्रिय वन मंत्री तथा वीरशैव समाजाचे धडाडीचे नेते मा. ना. ईश्वर अण्णा खंड्रे यांच्या हस्ते होणार असुन अध्यक्ष स्थानी शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे हे उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष बसवकल्याण येथील भाजपा आमदार मा. श्री शरणू सलगर उपस्थित राहणार आहेत. या प्रसंगी महाराष्ट्रासह कर्नाटक व तेंलगणा राज्यातील २५-३० मठाधीपती / धर्मगुरु यांच्यासह अनेक लोकप्रतिनीधी व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून शिवा संघटनेचे राष्ट्रीय सरचिटणीस श्री. उमाकांत आप्पा शेटे पुणे, राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री. अभयराव कल्लावार नागपूर, राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा माजी आमदार श्री. शिवशरण पाटील बिराजदार सोलापूर, राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. वाय. बी. सोनटक्के मुंबई, राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा या कार्यक्रमाचे सयोजक श्री दत्ताभाउ खंकरे उदगीर, महाराष्ट्र उपाध्यक्ष श्री. वैजनाथ तोनसुरे नांदेड, श्री. शैलेश जक्कापूर पुणे, सुनिल वाडकर नाशिक, श्री. भिमाआप्पा खांदे खांमगाव, महाराष्ट्र सरचिटणीस श्री. धन्यकुमार शिवणकर परभणी, व श्री. रूपेश होनराव डोंबीवली, सेवा जनशक्ती पार्टीचे प्रदेश पर्वते विठठलराव ताकबीडे, कर्मचारी महासंघाचे राज्य सरचिटणीस श्री संजय कोठाळे, शिवा सोशल मिडीयाचे प्रदेश अध्यक्ष मनिष पंधाडे बुलढाणा, पश्चिम कर्नाटक संपर्क प्रमुख प्रा. परमेश्वर आरबळे, कर्मचारी महासंघाचे राज्य उपाध्यक्ष श्री संतोष शेटकर नांदेड, श्री अरुण लद्दे नाशिक, शिवा संघटनेचे राज्य चिटणीस प्रा. किसनअप्पा इमडे वसमत व श्री सातलिंग स्वामी उस्मानाबाद, प्रांत सदस्य श्री बालाजी बंडे मुखेड, श्री नारायण कंकणवाडी राज्य मुख्य संघटक, व विभागीय अध्यक्ष श्री अर्जुनराव सैदाने वसमत, श्री अरविंद भडोळे पाटील सोलापुर, श्री अनिल कोठुळे नाशिक, श्री उध्दव खराडे नवि मुंबई, श्री देवानंद वोन्ते कारंजा लाड, श्री गजानन बाजारे वर्धा, श्री वीरभद्र वसापुरे धर्मावाद, श्री विलास मोदे बुलढाणा, श्री दिगंबर मांजरमकर नांदेड, यांच्यासहीत शिव किर्तनकार शि भ. प श्री भगवंतराव पाटील चांभरगेकर, शि.भ.प. श्री मन्मथअप्पा डांगे, शि.भ.प. श्री शिवशरण गुरुजी रटकलकर आणि उद्गीर समाजाचे अध्यक्ष श्री चंद्रकांत अण्णा वैजापुरे इ. उपस्थित राहणार आहेत.

वीरशैव लिंगायत समाजाचे शक्तीस्थळ असलेल्या व बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वर यांनी अनुभव मंटप नावाची धर्मसंसद स्थापन करुन जगातील पहील्या संसदीय लोकशाहीचे बीजे रोवली ते पवीत्र ठिकाण असलेल्या कर्नाटक राज्याच्या विदर जिल्ह्यातील श्री क्षेत्र बसवकल्याण येथे संपन्न होणाऱ्या शिवा संघटनेच्या तिसाव्या ऐतिहासीक वर्धापन दिन सोहळयात सहभागी होण्यासाठी शिवा संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्याऱ्यांनी आपआपल्या कार्यक्षेत्रातील कार्यकर्ते व समाज बांधवाच्या बैठका घेवुन जीप रॅली काढुन वेळेवर कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे नियोजन करावे आणि नांदेड व लातूर जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांनी बॅनर झेंडे लावलेली आपआपली वाहने घेवुन मंगळवार दि. २८ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९.०० वाजे पर्यंत उद्गीर येथील महात्मा बसवेश्वर पुतळ्याजवळ उपस्थित रहावे, उद्गीर येथिल पुतळयापासुन बरोबर सकाळी १०.०० वाजता संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांच्या हस्ते पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन ही भव्य जिप रॅली त्यांच्या नेतृत्वात बसवकल्याण कडे रवाणा होवुन १२.३० च्या वर्धापन दिन सोहळयात उपस्थित रहावयाचे आहे. त्यानुसार सर्वानी नियोजन करावे असे अवाहान करण्यात येत आहे.

आपणास माहिती आहेच की, शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटना या सामाजीक संघटनेची स्थापना दि. २८ जानेवारी १९९६ रोज रविवारी शिवलिंगेश्वर मंदिर सिडको नांदेड येथे करण्यात आली आहे. शिवा संघटना ही महाराष्ट्रातील ८५ लाख वीरशैव- लिंगायत समाजातील वेगवेगळ्या जाती उपजातींचे नेतृत्व करणारी एकमेव प्रभावी व प्रवळ संघटना आहे. शिवा संघटनेकडुन गेली ३० वर्षात महाराष्ट्रातील वीरशैव लिंगायत समाजातील एकुण २१ जातींना राज्यात व केंद्रात ओबीसी / एसबीसीचे आरक्षण मिळवुन देण्यासह संसदेत महात्मा बसवेश्वरांचा पुतळा बसविणे, महाराष्ट्रासह देशात महात्मा बसवेश्वर यांची शासकीय जयंती साजरी करणे, शालेय अभ्यासक्रमात महात्मा बसवेश्वरांच्या जिवनावरील धडे समाविष्ठ करणे, महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणे, महात्मा बसवेश्वर सामाजिक समता शिवा पुरस्कार मंजुर करणे, महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे नाने प्रकाशित करणे, महात्मा बसवेश्वर यांचे मंगळवेढा येथील राष्ट्रीय स्मारक मंजुर करून घेणे, सोलापुर व नांदेड विद्यापिठात महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र मंजुर करणे, हजारो ठिकाणी चौक व रस्त्यांना महात्मा बसवेश्वरांचे नामकरण करणे यासह इतर अनेक सामाजिक प्रश्न शिवा संघटनेने शासनाकडुन मंजुर करून घेतलेले आहेत.

आपणास माहिती आहेच की, प्रतिवर्षी शिवा संघटनेचा स्थापना दिवस वर्धापन दिन सोहळा म्हणुन वेगवेगळ्या ठिकाणी अंत्यत उत्साहात साजरा केला जातो. ज्यामध्ये प्रामुख्याने दि. २८ जानेवारी २००६ रोजी शिवा संघटनेचा १० वा वर्धापन दिन दिल्ली येथील राष्ट्रपती भवनाजवळील मालवनणकर सभागृहात संपन्न झाला होता. त्यावेळी शिवा एक्सप्रेस नावाची स्वतंत्र रेल्वे आठ दिवस भाडयाने घेवुन महाराष्ट्रातील १६०० गणवेशधारी स्वयंसेवक सहभागी झाले होते. तर दि. २८ जानेवारी २०१३ चा शिवा संघटनेचा १७ वा वर्धापन दिन सोहळा २०० गणवेशधारी स्वयंसेवकांकडून श्रीलंकेची राजधानी असलेल्या कोलंबो शहरातील ग्लोबल टावर नावाच्या पंचतारांकीत हॉटेलमध्ये साजरा करण्यात आला होता.

तसेच दि. २८ जानेवारी २०१७ चा शिवा संघटनेचा २१ वा वर्धापन दिन सोहळा ६५ गणवेशधारी स्वंयसेवकासह इंलंडची राजधानी असलेल्या लंडन येथे हॉटेल डबल ट्री बाय हिल्टन, २-८, हांगर लेन, इलिंग कॉमन, लंडन ह्या पंचतारांकित हॉटेलमध्ये अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला होता. तर दि. २८ जानेवारी २०१८ रोजी २२ वा वर्धापन दिन सोहळा तेलंगणा राज्याची राजधाणी असलेल्या हैदराबाद शहरातील इडन गार्डन येथे साजरा केला होता. आणि शिवा संघटनेचा पहीला वर्धापन दिन सोहळा चाकुर येथील पाटील वाडयावर तर उर्वरीत वर्धापन दिन महाराष्ट्राती वेगवेगळ्या ठिकाणी साजरे करण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणेच यंदाचा ३० वा वर्धापन दिन सोहळा कर्नाटक राज्यातील बिदर जिल्ह्याच्या श्री क्षेत्र बसवकल्याण येथे मोठ्या उत्सहात साजरा केला जाणार आहे..तरी मंगळवार दि. २८ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १२:३० वाजता शिवा संघटनेच्या ३० व्या वर्धापन दिन सोहळयात सहभागी होण्यासाठी आपआपल्या भागातुन भव्य जिप रॅली काढत आणि उद्गीर येथील महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळयापासुन सकाळी १०.०० वाजता प्रा. मनोहर धोंडे यांच्या नेतृत्वाखाली निघणाऱ्या भव्य जिप रॅलीमध्ये ढोल ताश्याच्या गजरामध्ये सहभागी होण्यासाठी सर्वांनी वेळेवर उपस्थित रहावे असे अवाहन करण्यात येत आहे.